**मंत्रालयीन सेवेतील लिपिक,लिपिक-टंकलेखक, सहायक पदाची सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा आणि कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठीची विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्याबाबत सूचना.** ५१

**महाराष्ट्र शासन,**
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक : सेप्रप्र-२०१३/प्र.क्र.१९/१७
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ७ ऑक्टोबर,२०१३.

वाचा : (१) अधिसूचना क्रमांक :इएक्सएम-२१७६/सतरा, दिनांक ६ जून,१९७७.
(२) अधिसूचना क्रमांक : इएक्सएम-१६७६/सतरा, दिनांक ६ जून,१९७७.
(३) अधिसूचना क्रमांक :इएक्सएम-१२७६/सतरा, दिनांक ६ जून,१९७७.
(४) अधिसूचना क्रमांक :एसआरव्ही-११९०/११५/चौदा-ब, दिनांक ५ डिसेंबर,१९९१.
(५) शासन निर्णय क्रमांक :इएक्सएम-१०७५/१६८१/१७, दि.२४ ऑगस्ट,१९७६.
(६) शासन निर्णय क्रमांक : परीक्षा-१२०६/प्र.क्र.७/०६/१७, दि.१६ नोव्हेंबर,२००६.
(७) शासन परिपत्रक क्र.परीक्षा-२०१२/प्र.क्र.३/१७, दि.१३ सप्टेंबर,२०१२.

**<u>प रि प त्र क</u>**

मंत्रालयीन सेवेतील लिपिक,लिपिक-टंकलेखक,सहायक पदाची सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा आणि कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी आणि सरळसेवेने नियुक्त कक्ष अधिकारी यांच्यासाठी विभागीय परीक्षा नियम शासनाने विहित केले आहेत. त्याबाबतचा सविस्तर तपशील पुढील विवरणपत्रात नमूद केला आहे.

| **पदनाम** | **विभागीय उत्तीर्ण होण्यासाठी कालावधी/संधी** | **विभागीय परीक्षा विहित मुदतीत उत्तीर्ण न केल्यास होणारे परिणाम** |
|---|---|---|
| लिपिक, लिपिक-टंकलेखक | नियमित नियुक्ती दिनांकापासून ४ वर्षात ३ संधीमध्ये | परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत वेतनवाढ रोखण्यात येते. ज्येष्ठता गमवावी लागते. |
| सहायक | नियमित नियुक्ती दिनांकापासून ४ वर्षात ३ संधीमध्ये | परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत वेतनवाढ रोखण्यात येते. ज्येष्ठता गमवावी लागते. |
| कक्ष अधिकारी | सहायक म्हणून ९ वर्षाच्या अखंड सेवेमध्ये(सहायक पदावर ५ वर्षाची अखंड सेवा आणि सहायक सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर) ३ संधीमध्ये | कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठीची सहायक संवर्गातील मूळ ज्येष्ठता गमवावी लागते. |
| सरळसेवा नियुक्त कक्ष अधिकारी | परिविक्षा कालावधीत परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अपवादात्मक परिस्थितीत शासन १ वर्ष परिविक्षा कालावधी वाढवून देऊ शकते. | शासकीय सेवेतून काढून टाकला जाण्यास पात्र |

२. मागासवर्गीय उमेदवारांना विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी १अतिरिक्त वर्ष कालावधी व १ अतिरिक्त संधी देण्याबाबतची तरतूद क्रमांक:इएक्सएम-१०७५/१६८१/१७, दि.२४ ऑगस्ट,१९७६ आणि क्रमांक :परीक्षा-१२०६/प्र.क्र.७/०६/१७, दि.१६ नोव्हेंबर,२००६ च्या शासन निर्णयात केली आहे. सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा / विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यासंदर्भात सविस्तर परिपत्रक क्र.परीक्षा-२०१२/प्र.क्र.३/१७, दि.१३ सप्टेंबर,२०१२ रोजी निर्गमित केले आहे. वर नमूद विभागीय परीक्षा संबंधीत तपशील कर्मचारी/अधिकाऱ्यांच्या केवळ माहितीसाठी नमूद केलेला आहे. अधिक माहितीसाठी संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांनी संदर्भांकित अधिसूचना / शासन निर्णय पहावेत.

३. वरीलप्रमाणे विभागीय प्रशिक्षण परीक्षा विहित कालावधी आणि संधीमध्ये उत्तीर्ण न झाल्यास संबंधित कर्मचाऱ्यांना आर्थिक नुकसान सोसावे लागते. पुढील पदोन्नतीच्या संधी डावलल्या जातात. अशाप्रकारे विभागीय परीक्षा उत्तीर्ण न होण्याचे परिणाम गंभीर स्वरुपाचे असल्याने त्याबाबत सर्व संबंधितांनी सतर्क राहून विहित मुदतीत परीक्षा उत्तीर्ण होणे गरजेचे आहे, ही बाब या परिपत्रकाद्वारे सर्वांच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( राजेंद्र सुर्वे )
**सह सचिव,महाराष्ट्र शासन**

प्रत,

सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,(पत्राने)
सामान्य प्रशासन विभाग १२-अ/कार्या-१४ ब

सर्व मंत्रालयीन विभाग, (आस्थापना)

२. त्यांना विनंती करण्यात येते की, सदरहू परिपत्रक आपल्या विभागाच्या सूचना फलकावर लावावे तसेच सर्व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावे.

३. निवड नस्ती.

E:\Sujata 2013\Assistant2013\Letter 2013.rtf